# प्रेसनोट

दि.२४/०२/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | भिंगार कॅम्प पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.८५/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | रमेश अमृता बुधवंत, वय–५७ वर्ष, राज्य कर अधिकारी (राजपत्रित, गट–ब), नेमणुक वस्तू व सेवा कर भवन, अहमदनगर रा.खराडी, पुणे |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोड अंती ३५,०००/– रुपये लाचेची मागणी केली. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये २०,०००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांचा मोबाईल फोन व इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे वितरणाचा व्यवसाय असून तक्रारदार यांच्या कडून त्यांचे व्यवसायातील उलाढाली संबंधाने विक्रीकर ताळेबंद सादर करताना काही त्रूटी आढळल्याने आरोपी लोकसेवक रमेश अमृता बुधवंत, राज्य कर अधिकारी (राजपत्रित, गट–ब), नेमणुक वस्तू व सेवा कर भवन, अहमदनगर यांनी तक्रारदार यांना वाढीव कर भरणा करण्याबाबत नोटीस अदा केली होती. सदरची नोटीस निरस्त करणे तसेच तक्रारदार यांचा व्हॅट करापोटी परतावा मिळवून देण्याकरीता मदत करण्यासाठी आरोपी लोकसेवक बुधवंत यांनी दि.२३/२/२०२२ रोजी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष ५०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ३५,०००/– रुपये रक्कम घेण्याचे ठरवून लाचेचा पहिला हप्ता रुपये २०,०००/– लाचेची रक्कम दि.२३/२/२०२२ रोजी तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष त्यांचे कार्यालयात स्वीकारली असता आरोपी लोकसेवक बुधवंत यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :– | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर |
| संकेतस्थळ | :– | acbmaharashtra.gov.in |
| ई–मेल ऑनलाईन तक्रार | :– | acbwebmail@mahapolice.gov.in |
| ॲप्लीकेशन | :– | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :– | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :– | ०२४१–२४२३६७७ |
| व्हॉटस अप क्रमांक | :– | ९९३०९९७७०० |

24/02

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर